# साहित्यातून सुसंवादाची निर्मिती : दौंड

**पाथर्डी शहर : पुढारी वृत्तसेवा**

साहित्य व कलाक्षेत्रातील प्रतिभा परमेश्वराने सर्वांनाच दिली. पण त्याचा योग्य सदुपयोग फारच थोडे करतात. भाषेतून व्यक्त होण्याचे सामर्थ्य कवी व विचारवंतांमध्ये असते. राजकारणी व साहित्यिकांची दरी वाढत चालल्यामुळे समाज बिघडत चालला आहे. ज्यावेळी सुसंवाद निर्माण होईल, त्यावेळी राष्ट्र पुढे जाईल. साहित्यातूनच संवाद निर्माण होतो, म्हणूनच विसंवादी जगामध्ये सुसंवाद निर्माण करण्याचे काम साहित्य करते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. कैलास दौंड यांनी केले.




**पाथर्डी : थोर स्वातंत्र्यसेनानी स्व. बाबूजी आव्हाड जन्मशताब्दीनिमित्त आयोजित साहित्य जागरमध्ये बोलताना डॉ. कैलास दौंड.**

बाबूजी आव्हाड महाविद्यालयात थोर स्वातंत्र्यसेनानी व माजी आमदार स्व. बाबूजी आव्हाड यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित साहित्यप्रेमी बाबूजी आव्हाड साहित्य जागर कार्यक्रमात दौंड बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे शाखाध्यक्ष अविनाश मंत्री होते. पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष सुरेशराव आव्हाड, विश्वजित गुगळे, रामकिसन शिरसाठ, विश्वस्त सुनील साखरे, प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे यावेळी उपस्थित होते.

डॉ. दौंड म्हणाले की, तालुक्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व साहित्यिक क्षेत्रांत माजी आमदार स्व. बाबूजी आव्हाड यांचे मोलाचे योगदान आहे. तालुक्यातील साहित्यिक ऊसतोडणी कामगारांवर साहित्य लिहितात. पण बाबूजींनी त्यांची परिस्थिती बदलण्याचे महान कार्य केले. ऊसतोडणी कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी त्यांना अनुदान, मदत न देता त्यांच्या मुलांना शिक्षण दिले पाहिजे. तरच त्यांच्या हातातून कोयता जाईल. म्हणूनच त्यांनी या गोरगरीब जनतेसाठी पार्थ विद्या प्रसारक मंडळाची स्थापना केली. बाबूजींचा त्याग नव्या पिढीला कळण्यासाठी नवसाहित्यिकांनी लिहितं व्हावं. यावेळी संजय मेहरकर व रमेश मोरगावकर यांचा सन्मान करण्यात आला. अजय रक्ताटे यांच्याकडून सर्व कवींना काव्यसंग्रह भेट देण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे, सूत्रसंचालन डॉ. बबन चौरे, डॉ. अशोक कानडे, डॉ. अभिमन्यु ढोरमारे, तर आभार डॉ. सुभाष शेकडे यांनी मानले. साहित्यिक अनंत कराड, संदीप काळे, लक्ष्मण खेडकर, अर्जुन देशमुख, वसंत होळकर, ज्योती आधाट, हुमायून आतार, डॉ. राजकुमार घुले, शरद मेढे, प्राचार्य अशोक दौंड, संतोष दहिफळे, राजेंद्र सावंत, बाबासाहेब गर्जे, महेंद्र शिरसाठ आदी उपस्थित होते. यावेळी स्व. आव्हाड जन्मशताब्दी व ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथप्रदर्शन भरविले होते.